**NAAC परिस-स्पर्श योजने** अंतर्गत **कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद**







कोल्हापूर :

महाराष्ट्र शासनाच्या **RUSA उपक्रमांतर्गत परिस-स्पर्श योजने** अंतर्गत **राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर** येथे **"NAAC द्वैध मानांकन प्रणाली व संस्थात्मक तयारी"** या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळा **IQAC, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** आणि **IQAC, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर** यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या **डॉ. अनिता बोडके** यांनी अध्यक्षीय भाषणात परिस स्पर्श योजनेचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, NAAC ची नवीन **द्वैध मानांकन प्रणाली** ही उच्च शिक्षण संस्थांसाठी गुणवत्तावृद्धीचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. यावेळी त्यांनी राजाराम महाविद्यालयाने NAAC च्या तिसऱ्या चक्रात **3.31 CGPA सह 'A+' श्रेणी** प्राप्त केल्याचा उल्लेख केला व

Mentor संस्थेच्या भूमिकेतून सर्व सहभागी महाविद्यालयांना मार्गदर्शन करण्याची बांधिलकी व्यक्त केली.

कार्यशाळेतील प्रमुख सत्रात **प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर**, समन्वयक, परिस स्पर्श योजना तसेच संचालक, IIC, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी परिस स्पर्श योजनेची आवश्यकता, उद्दिष्टे तसेच NAAC द्वैध मानांकन प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली. तर **डॉ. अंजली पाटील**, IQAC समन्वयक, राजाराम महाविद्यालय यांनी द्वैध मानांकनातील प्रक्रिया व संस्थात्मक तयारी याबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत सहभागी झालेल्या सर्व Mentee महाविद्यालयांच्या प्राचार्य, IQAC समन्वयक व सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून NAAC मानांकन प्रक्रियेची सखोल माहिती प्राप्त केली. कार्यशाळेमुळे सहभागी महाविद्यालयांना NAAC प्रक्रियेबाबत स्पष्टता मिळाली असून आगामी मानांकनासाठी आवश्यक तयारीबाबत दिशा मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी **श्री. अनिल मरळे**, IQAC सह-समन्वयक, राजाराम महाविद्यालय यांनी आभार प्रदर्शन केले. सदर कार्यशाळेमुळे Mentor–Mentee महाविद्यालयांमधील समन्वय अधिक दृढ होऊन गुणवत्तावृद्धीच्या प्रवासाला नवी चालना मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.